**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ०५ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **व्यक्तीचा स्वाभिमान आणि संरक्षणासाठी शिक्षण अत्यावश्यक असून, संवेदनशील शिक्षक या भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवतात, असं राष्ट्रपतींचं प्रतिपादन; राज्यातल्या 6 शिक्षकांना राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान.**
2. **उद्याच्या गणेशविसर्जनासाठी प्रशासनाची तयारी / ईद-ए-मिलाद निमित्त राज्यात विविध कार्यक्रम.**
3. **महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे २९ जिल्ह्यांत शेती पिकाचे नुकसान; १४, लाखाच्यावर हेक्टर क्षेत्र बाधित; कृषी मंत्री दत्तात्रय भरणेंची माहिती.**

**आणि**

4. **राष्ट्रवादी चिंतन शिबिराचे नागपूरमध्ये येत्या 19 सप्टेंबर रोजी आयोजन.**

**आता सविस्तर बातम्या .......**

शिक्षक दिन

अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांप्रमाणेच शिक्षण हे व्यक्तीचा स्वाभिमान आणि संरक्षणासाठी अत्यावश्यक असून संवेदनशील शिक्षक या भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवतात, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. शिक्षक दिनाच्या निमित्ताने, नवी दिल्लीतल्या विज्ञान भवनात राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात त्या बोलत होत्या. माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनी देशात शिक्षक दिन साजरा केला जातो. या पुरस्कार विजेत्या शिक्षकांमध्ये महिलांची, तसंच ग्रामीण भागातल्या शिक्षकांची संख्या लक्षणीय आहे, याचा राष्ट्रपतींनी आवर्जून उल्लेख केला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातल्या तरतुदींचा उल्लेख करून मुलींच्या शिक्षणातली गुंतवणूक ही कुटुंब, समाज आणि देशाच्या उभारणीत अनन्यसाधारण भूमिका बजावते, असं प्रतिपादन त्यांनी केलं. आधुनिक भारताच्या उभारणीत सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करताना त्या म्हणाल्या,.........

***(होल्ड बाईट-राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू 20 सेकंद)***

***बालिकाओं की शिक्षा पर सर्वाधिक महत्त्व दिया जाना चाहिए। बेटियों की शिक्षा में निवेश करके हम अपने परिवार, समाज और राष्ट्र के निर्माण में अमूल्य निवेश करते हैं। आधुनिक भारत में स्त्री शिक्षा की आधारशिला रखने वाली सावित्रीबाई फुले जी की स्मृति में मैं उनको सादर नमन करती हूँ।***

गेल्या काही वर्षांत उच्च शिक्षण, तसंच स्टेम, अर्थात विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या क्षेत्रांमध्ये मुलींचा सहभाग वाढत असल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी राष्ट्रपतींनी देशातल्या ६६ शिक्षकांना उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार प्रदान केले. त्यात राज्यातल्या 6 शिक्षकांचा समावेश आहे. यामध्ये नागपूरच्या संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण

संस्था, येथील अनिल जिभकाटे यांचाही समावेश असून त्यांनी नवीन पिढीला व्यावसायिक कौशल्य आणि शिक्षणाद्वारे सक्षम करण्यासाठी नागपूरच्या वर्किंग कार्यशाळांपासून आपली यात्रा सुरू केली, जिथे त्यांनी 700 हून अधिक शिक्षण सत्रांचे आयोजन केले आणि 14 पेक्षा जास्त पात्रता (क्वालिफिकेशन्स) मध्ये सहभाग घेतला. या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांना प्रमाणपत्र, रौप्य पदक आणि 50 हजार रुपयांचे रोख बक्षीस प्रदान केले. नांदेड जिल्ह्यातल्या अर्धापूर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक आणि विज्ञान विषयाचे शिक्षक डॉ.शेख मोहम्मद वकीउद्दीन शेख हमीद उद्दीन यांनी विविध उपक्रमांच्या माध्यमातून शाळेला शिक्षणासोबतच सामाजिक सुधारणांचं केंद्र बनवण्याचं काम केलं. त्यांनी मुलींसाठी तात्पुरत्या स्वरुपात शाळेची शाखा सुरु केली. ५ लाख सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करुन दिलेतसंच सामाजिक सहकार्यानं निधी उभारून शिक्षणासाठीची डिजीटल सामग्री उपलब्ध करून दिली. लातूरच्या दयानंद कला महाविद्यालयाचे संगीत विषयाचे प्राध्यापक डॉ.सांदिपान जगदाळे यांनी संगीत विषयाच्या अध्यापनाला शास्त्रीय ज्ञानासोबतच, नाविन्यपूर्ण प्रयोगांचीहीजोड दिली. त्यांनी ब्रेल लिपीत संगीत अभ्यासक्रमाची पुस्तकं तयारकेली तसंच QR कोडवर आधारित अभ्यास साहित्य विकसित करून शिक्षणालाअधिक सुलभ आणि परिणामकारक बनवलं. त्यांनी गोंड आदिवासी वस्त्यांमध्ये जाऊन शिक्षणाचा प्रसार केला, तसंच एचआयव्ही बाधित विद्यार्थ्यांचं शैक्षणिक पालकत्व घेतलं, यासोबतच ते दिव्यांग विद्यार्थ्यांनाही मदत करत आले आहेत. बारामतीचे पुरुषोत्तम पवार मुंबईच्या डॉ. नीलाक्षी सुभाष जैन आणि सोनिया विकासकपूर यांनाही राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार यंदा मिळाला आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. पुरस्कार विजेत्या शिक्षकांशी नंतर राष्ट्रपतींनी अमृत उद्यानात संवाद साधला.

गणेश विसर्जन

राज्यात उद्या गणेश विसर्जन होणारअसून विविध ठिकाणी जय्यत तयारी करण्यात आली आहे. पुण्यात उद्यासकाळी साडे नऊ वाजल्यापासून विसर्जन मिरवणुकीला सुरुवात होणार आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी नागपूर महानगरपालिकेद्वारे शहरातील सर्व तलावांमध्ये विसर्जनाला पूर्णत: बंदी करण्यात आली आहे. विसर्जनासाठी मनपातर्फे शहरातील प्रमुख तलावांचे परिसर तसेच अन्य २१६ ठिकाणी एकूण ४१९ कृत्रिम विसर्जन तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे.विशेष म्हणजे, सहा फूट व त्यापेक्षा मोठ्या गणेशमूर्ती विसर्जनासाठी गोरेवाडा कृत्रिम तलाव सज्ज असून, हा कृत्रिम तलाव कोराडी कृत्रिम तलावापेक्षा मोठा आहे. अकोल्यातील मोरणा घाटावर यंदा गणेश विसर्जनाचा उत्सव मोठ्या उत्साहात पार पडणार असून, गणरायाला निरोप देण्यासाठी घाटावर गर्दी करणार असून, यासाठी प्रशासन आणि महानगरपालिकेने विशेष तयारी केली आहे.अकोला महानगरपालिकेचे तब्बल १०० कर्मचारी घाटावर नियुक्त करण्यात आले आहेत.

ईद मिलाद उन नबी

ईद मिलाद उन नबी अर्थात प्रेषित महंमद यांचा जन्मदिवस आज साजरा होत आहे. हिजरी कालगणनेनुसार प्रेषित महंमदांची ही पंधराशेवी जयंती असल्यामुळे यावर्षी या सणाला आणखी महत्त्व आहे. ठिकठिकाणी मिलाद मैफिली आणि सीरत परिषदांचं आयोजन करण्यात आलं आहे, तसंच मिरवणुका काढण्यात येत आहेत. प्रेषित मोहम्मद पैगंबरांच्या जन्मदिनानिमित

नागपूरमधे  जामा मशीद, मोमिनपुरा येथून भव्य मिरवणूक काढत  ईद मिलादुन्नबीचा उत्सव साजरा करण्यात आला. ईद निमित्त राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह सर्वधर्माच्या समाज बांधवांनी हजेरी लावत मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. शहरात नेहमीप्रमाणे सामाजिक ऐक्याचे दर्शन देत सर्व समाजाच्या वतीने जागोजागी मिरवणुकीत सहभागी बांधवांसाठी अल्पोपाहारासह, सरबत, पिण्याचे पाणी, फळ आदीचे स्टॉल लावण्यात आले होते. भंडाऱ्याचा राजा गणेश मंडळात  हिंदू-मुस्लिम बांधव एकत्र येत  ईद ए मिलाद साजरा करत असल्याचे दृश्य भंडाऱ्यात बघायला मिळाले असून गणेश मंडळाकडून जुलुसामध्ये शामिल असलेल्या मुस्लिम बांधवांचे फुलांचा वर्षाव करत  स्वागत करण्यात आल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीने दिली आहे.

नुकसान भरपाई

महाराष्ट्रात दरवर्षी अतिवृष्टी, पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होतं. नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील तब्बल २९ जिल्ह्यांतील १९१ तालुक्यांमध्ये मोठे नुकसान झाले असून, या काळात झालेल्या पावसामुळे ६५४ पेक्षा जास्त महसूल मंडळांमधील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. १५ ते २० ऑगस्ट दरम्यान पडलेल्या सर्वाधिक पावसामुळे शेती पिकांचे जास्त नुकसान झाले आहे. राज्यात १४,लाख ३६ हजार २७६ हेक्टर क्षेत्र बाधित झाले  असून त्यापैकी १० हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र बाधित असलेले १२ जिल्हे असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे  यांनी आज दिली.  सर्वाधिक बाधित 12 जिल्ह्यांपैकी विदर्भात वाशीम- यवतमाळ - बुलढाणा -अकोला यांचा समावेश असून  सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. काही ठिकाणी भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद या पिकांनाही फटका बसला आहे. बाधित भागातील सुरु केलेले पंचनाम्याचे काम अंतिम टप्प्यात असून शेतकऱ्यांना योग्य ती मदत तातडीने देण्यात येईल. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. शेतकरी बांधवांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे, असेही भरणे यांनी स्पष्ट केल.

अधिवेशन

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे 'राष्ट्रवादी चिंतन शिबिर' येत्या १९ सप्टेंबर  शुक्रवार रोजी नागपुरात आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांनी आज दिली. अनेक दशकांनंतर प्रथमच एवढ्या व्यापक स्वरूपात राष्ट्रवादी चिंतन शिबिराचे आयोजन होत आहे. अजितदादा पवारांच्या  नेतृत्वाखाली पक्ष केवळ पुढच्या निवडणुकीची नव्हे, तर पुढच्या दोन दशकांची दिशा ठरवत आहे," असे सुनील तटकरे यांनी मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. अलीकडील विधानसभा निवडणुकांमध्ये पक्षाने तब्बल ५८ लाख १६ हजार ५६६ मते मिळवत लोकसभा तुलनेत जवळपास तिप्पट वाढ नोंदवली. या यशानंतर राष्ट्रवादी आता संघटनात्मक बळकटीसह वैचारिक परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करणार आहे. असे तटकरे म्हणाले.या शिबिरात आमदार, खासदार, वरिष्ठ नेते, युवक प्रतिनिधी आणि देशभरातील विचारवंत सहभागी होणार आहेत.

बावनकुळे

कुठल्याही समाजाचे आरक्षण काढून ते दुसऱ्या समाजाला दिले जाणार नाही. काही जण सामाजिक सलोखा बिघडवत असून संभ्रम निर्माण करीत आहेत. ज्यांच्याकडे कुणबी नोंद असेल त्यांनाच जातीचे प्रमाणपत्र मिळणार आहे. पुरावे नसल्यास प्रमाणपत्र मिळणार नाही. त्यामुळे ओबीसींनी संभ्रमित होऊ नये, असे मत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.ते आज नागपूर येथे प्रसार माध्यमांशी बोलत होते.

हवामान

पुढील अर्ध्या तासात अमरावती नागपूर यवतमाळ आणि वर्धा जिल्ह्याच्या तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

*****